भतवाल हॉस्पिटल
म्हणजेच
गंगाराम हॉस्पिटल
अग्रवाल नगर,मालेगाव रोड, धुळे
मो.नं. 9158587711

# आपला महाराष्ट्र

मूल्य २.००

संस्थापक - लोकमित्र भाई मदाने

WWW.APLAMAHARASHTRA.IN

POST REGD.No./DHL/53/24-26

संयुक्त वर्ष ६९ ■ अंक क्र.३३० ■ बुधवार २ सप्टेंबर २०२६ ■ धुळे, नंदुरबार, जळगाव, नाशिक आवृत्ती ■ पाने ४

|| श्री गणेशाय नमः ||
कुणाल वधवा
9765595037
9405171771
श्रीराम बोरवेल्स
जमीन, घर, शेती यावर
४.७५, ५ व ६ इंची बोर करुन मिळेल.
तसेच सबमर्सिबल पंप बसवून मिळेल.
१४, राधाकृष्णन शॉपींग सेंटर, झाशी राणी चौक, मनपाजवळ, धुळे

## लोकसेवा आयोगाच्या पेपर फुटीत गौरव नंतर मुंबईच्या पोलिसांकडून ऋतुजा पाटील अटकेत

**नंदुरबार, दि. १ (प्रतिनिधी) : लोकसेवा आयोगाच्या अन्न आणि औषध निरिक्षक परीक्षा पेपरफुटीस प्रेमप्रकरण असल्याचा दावा करण्यात येत होता. तसा दावा पेपरफुटीची तक्रार करणाऱ्या ऋषीकेश गांगुर्डेने तसा दावा केला होता. त्याअनुषंगाने तपास करताना पोलिस पथकाने तक्रार देणाऱ्या गौरव पाटील याला अटक केली. पेपरफुटी प्रकरणातील मुख्य संशयित आरोपी ऋतुजा पाटील हिला मुंबई पोलिसांच्या पथकाने नंदुरबारमधून ताब्यात घेतले. प्राथमिक चौकशीनंतर तिला अटक करण्यात आली आहे.**

एमपीएससीच्या अन्न व औषध निरिक्षक पेपरफुटीप्रकरणात प्रेमाचा अँगल समोर आला होता. तक्रारदार गौरव पाटील आणि ऋतुजा पाटील यांच्या प्रेम प्रकरणातून हा पेपर फुटल्याचे सांगण्यात येत होते. मात्र, प्रेमाचा अँगल केवळ प्रकरण दाबण्याचा प्रयत्न असल्याचा आरोप दुसरा तक्रारदार ऋषिकेश गांगुर्डे याने केला होता. त्यातच, पोलिसांनी या प्रकरणात गौरव पाटीलला अटक केल्यानंतर आता ऋतुजा पाटीललाही ताब्यात घेऊन चौकशीनंतर अटक केली आहे. ऋतुजा पाटील हिला ज्ञानदीप सोसायटीतील राहत्या घरातून ताब्यात घेण्यात आले आहे. मुंबई पोलिसांचे पथक आज सकाळपासून नंदुरबारमध्ये दाखल झाले होते. या पथकाकडून नंदुरबारातील विविध ठिकाणी झाडाझडती आणि चौकशी केल्यानंतर अखेर ऋतुजा पाटील हिला अटक करण्यात आली. ऋतुजा पाटील हिला मुंबईतील विशेष गुन्हे शाखेच्या पथकाकडून नंदुरबारहून मुंबईला नेण्यात आले. ऋतुजा पाटील हिच्या अटकेमुळे औषध निरीक्षक पेपरफुटी प्रकरणाच्या तपासाला आता आणखी वेग येण्याची शक्यता आहे. यापुर्वी, पोलिसांनी प्रवीण पाटील यासही अटक केली आहे.

**वरिष्ठ अधिकाऱ्यांनाही अटक**

अन्न,औषध प्रशासनातील औषध निरीक्षक, गट-ब पदासाठी महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात आलेली संपूर्ण भरती प्रक्रिया रद्द करण्यात आली आहे. त्यानंतर मुंबई गुन्हे शाखेने याप्रकरणात मोठी कारवाई केली. मुंबई गुन्हे शाखेने एमपीएससीच्या तीन अधिकाऱ्यांसह सहा जणांना अटक केली आहे. औषध निरीक्षक पेपरफुटीप्रकरणात एमपीएससीचे अप्पर सचिव अभिजीत लेंडवे यांनाही अटक करण्यात आली आहे.

**पेपर मास लेव्हला फुटला**

पोलिसांनी (पान ४ वर)

### सुप्रीम कोर्टाच्या निर्णयानंतर सीजेपीचा निषेध मोर्चा रद्द

नवी दिल्ली, दि. १ : वीस जुलै रोजी झालेल्या कॉकरोच जनता पार्टी (सीजेपी) आंदोलनानंतर ज्या विद्यार्थी आंदोलकांवर एफआयआर दाखल झाले होते, त्यांना सर्वोच्च न्यायालयाने मोठा दिलासा दिला आहे. सर्वोच्च न्यायालयाने मंगळवारी वीस ते पंचवीस जुलै दरम्यान दाखल केलेले सर्व एफआयआर रद्द केले. मात्र, ज्यांची गुन्हेगारी पार्श्वभूमी आहे, त्यांच्यावरील गुन्हे रद्द करण्यात आले नाहीत. न्यायालयाने निर्देश दिले की, सर्व राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांमध्ये विद्यार्थ्यांविरुद्ध दाखल केलेले सर्व खटले रद्द मानले जातील. सर्वोच्च न्यायालयाच्या या निर्णयानंतर सीजेपीने दिल्लीत पाच सप्टेंबर रोजी नियोजित असलेला निषेध मोर्चा रद्द केला आहे. केंद्र सरकारने दिलेल्या (पान ४ वर)

## राज्यातून आमली पदार्थांचे उच्छाटन मंत्रीमंडळाच्या बैठकीत मुंढेची चर्चा

मुंबई, दि. १ : नशामुक्त भारत अभियान अंतर्गत महाराष्ट्रातून २०२९ पर्यंत अंमली पदार्थांचे समुळ उच्छाटन करण्याचे लक्ष्य राज्य सरकारने निश्चित केले आहे. यासाठी गृह विभागाच्या माध्यमातून सर्वसमावेशक धोरणाला मंजुरी देण्यात आली. सरकारी कार्यक्रमांमध्ये आरोग्यदायी खाद्यपदार्थ बंधनकारक करावेत. शासकीय व निमशासकीय बैठका, कार्यक्रम तसेच उपहारगृहांमध्ये आरोग्यदायी अन्नपदार्थ उपलब्ध करून देण्याच्या धोरणाला मंजुरी देण्यात आली. यामध्ये संतुलित मेन्यू ठेवणे बंधनकारक करण्यात येणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली मंगळवारी (दि. १) मंत्रीमंडळाची



बैठक झाली. उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार बैठकीला उपस्थित होत्या; तर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे बैठकीला अनुपस्थित होते. या बैठकीत अन्न आणि औषध प्रशासन विभागाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांच्या मोहिमेवर चर्चा झाली.

**राज्याच्या विकासाशी चार निर्णय**

अन्न व औषध प्रशासनाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांच्या नेतृत्वाखाली सुरू असलेल्या प्रतिबंधित गुटखा आणि पानमसाला विरोधातील कारवाईची पार्श्वभूमीही बैठकीतील एका निर्णयाशी जोडली जात आहे. शासकीय-निमशासकीय बैठका, कार्यक्रम तसेच उपहारगृहांमध्ये आरोग्यदायी अन्नपदार्थ उपलब्ध करून देण्याच्या धोरणाला मंत्रीमंडळाने मंजुरी दिली आहे. त्यात २०२९ पर्यंत महाराष्ट्र नशामुक्त करण्याचे लक्ष्य निश्चित करण्यात आले. त्यासाठी गृह विभागाच्या माध्यमातून सर्वसमावेशक धोरणाला मंजुरी देण्यात आली. सरकारी कार्यक्रमांमध्ये आरोग्यदायी खाद्यपदार्थ (पान ४ वर)



## ग्रामपंचायत अधिकाऱ्यांनी सुरक्षिततेसह विविध मागण्यांकरीता मुक मोर्चा काढला

धुळे, दि.१- जळगाव जिल्हा पारोळा तालुक्यातील शिवरे येथे ग्रामसभा सुरू असतांना कर्तव्य बजावत असतांना स्व.पी.एन.पाटील यांचा शारीरिक, मानसिक त्रासामुळे हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले. या घटनेमुळे ग्रामपंचायत अधिकाऱ्यांमध्ये तीव्र संताप, असुरक्षेची भावना निर्माण झाली. ग्राम पंचायत अधिकाऱ्यांची सुरक्षितता व विविध मागण्यांसाठी महाराष्ट्र राज्य ग्रामपंचायत अधिकारी युनियन जिल्हा शाखा धुळेतर्फे मुकमोर्चा काढून मुख्यमंत्र्यांना जिल्हाधिकाऱ्यांच्या माध्यमातून निवेदन देण्यात आले.

शहरातील कल्याण भवन येथून जिल्हाधिकारी (पान ४ वर)

### स्मार्ट मीटरमध्ये छेडछाड ग्राहकांवर गुन्हे दाखल

धुळे, दि.१- स्मार्ट मीटरमध्ये छेडछाड करून वीजचोरी करणाऱ्या पाच ग्राहकांवर शिरपूर शहर पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. यापूर्वी अशाच प्रकरणांत चार ग्राहकांवर गुन्हे दाखल झालेले आहेत. महावितरणच्या धडक कारवाईमुळे वीजचोरांचे धाबे दणाणले आहे.

शोभाबाई मधुकर माळी (रा.मेथी ता.शिंदखेडा) या ग्राहकाच्या स्मार्ट मीटरमध्ये अनधिकृत स्वरूपाची भौतिक छेडछाड करून वीज वापराची नोंद कमी केल्याचे तपासणीत निदर्शनास आले. सहायक अभियंता प्रेमसागर चुनारकर यांच्या फिर्यादीवरून या ग्राहकावर गुन्हा दाखल करण्यात आला. शाहरुख शकील पिंजारी, एजाज कमरुद्दीन खाटीक, समीना सईद पिंजारी व फिरोजाबी निसार पिंजारी (पान ४ वर)

## शहरातील विविधांगी प्रश्नांवर लक्ष वेधण्यासाठी नागरी हक्क संघर्ष समितीचा आंदोलनाचा निर्णय

**धुळे, दि.१- शहरातील नागरी प्रश्नांवर लक्ष वेधणाऱ्या नागरी हक्क संघर्ष समितीने पुन्हा आक्रमक होण्याचा निर्णय घेतला आहे. सुमारे आठ महिन्यानंतर पुन्हा बैठक झाली. ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते रमेश पोतदार आणि कैलास हजारे यांच्या प्रमुख उपस्थितीत झालेल्या बैठकीत शहरातील प्रलंबित नागरी प्रश्नांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. संबंधित प्रश्नांबाबत प्रशासनाकडे निवेदने देऊन पाठपुरावा करण्याचा निर्णय यावेळी घेण्यात आला. प्रशासन दखल घेणार नसेल तर जनाधार मिळवीत परिणामकारक आंदोलन उभारू, असा निर्धार या बैठक करण्यात आला.**

नागरी हक्क संघर्ष समितीची बैठक रविवारी गल्ली क्रमांक सहा मधीर आर. आर. पाटील शॉपिंग कॉम्लेक्सच्या संपर्क कार्यालयात झाली. यावेळी चंद्रकांत येशीराव, संजय बगदे, संजय पाटील, सुधीर बडगुजर, दिलीप उपाध्ये, अशोक तोटे, सचिन सोनवणे, मिलिंद सोनवणे, पप्पू सहानी, डी.के. शिरोळे, धनंजय गाळणकर, संदीप शेवतकर, श्रीकृष्ण बेडसे, ईश्वर बारी उपस्थित होते. शहरातील आग्रारोडच्या कामाच्या दर्जाबाबत चिंता व्यक्त करण्यात आली. आग्रारोडच्या पुनर्विकासाचे काम सुरू असून, रस्ते बांधकामाचा दर्जा आणि कामाच्या गुणवत्तेबाबत नागरीक प्रश्न उपस्थित करीत आहेत. विविध रस्त्यांवर पडलेल्या खड्ड्यांमुळे नागरिकांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे. रस्ते कामात दर्जेदार साहित्याचा वापर, तांत्रिक निकषांचे पालन आणि नागरिकांच्या सुरक्षिततेला प्राधान्य देण्याची मागणी करण्यात आली. आग्रा रोडवरील गटारीच्या बांधकामाचा आढावा बैठकीत घेण्यात आला. गटारींचा योग्य उतार, पाण्याचा निचरा आणि बांधकामाची गुणवत्ता याकडे विशेष लक्ष देण्याची गरज व्यक्त करण्यात आली. याबाबत धुळे महानगरपालिकेच्या आयुक्तांची भेट घेऊन निवेदन देण्याचा निर्णय घेण्यात आला. गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर ध्वनी प्रदूषणाचा मुद्दाही बैठकीत चर्चिला गेला. गणेशोत्सव दरम्यान डीजेच्या आवाजावर नियंत्रण राहावे तसेच शक्य असल्यास डीजे मुक्त गणेशोत्सव (पान ४ वर)



## कोपर्ली ग्रा.पं.च्या भ्रष्टाचाराची चौकशी पोलिस बंदोबस्तात दप्तरांची तपासणी

**नंदुरबार, दि.१ (प्रतिनिधी)- नंदुरबार तालुक्यातील कोपर्ली ग्रामपंचायतीच्या विकास कामांमध्ये अनियमितता व कथित भ्रष्टाचार झाल्याच्या तक्रारीनंतर जिल्हा परिषदेच्या ग्रामविकास विभागाने चौकशी समिती स्थापन केली आहे. या समितीतील अधिकाऱ्यांनी नुकतीच पोलिस बंदोबस्तात ग्रामपंचायत कार्यालयात जाऊन विविध विकास कामे, निधीचा वापर तसेच ग्रामपंचायत दप्तरातील कागदपत्रांची सखोल पाहणी केली. दरम्यान, चौकशी सुरू असतानाच भाजपच्या सत्ताधारी पदाधिकाऱ्यांसह गावकरी व तक्रारदार यांच्यात आरोप-प्रत्यारोपांच्या फैरी झडल्याने काही** (पान २ वर)

### अमरावती दुर्घटनेच्या पार्श्वभूमीवर

## महापालिकेची फायर ऑडीटबाबत कार्यवाही आस्थापनांना अग्निसुरक्षा ऑडीट बंधनकारक

**धुळे, दि.१- अमरावती येथे घडलेल्या दुर्घटनेच्या पार्श्वभूमीवर धुळे महानगरपालिका क्षेत्रातील वैद्यकीय आस्थापनांच्या अग्निसुरक्षेबाबत महानगरपालिकेने कठोर पावले उचलली आहेत. भविष्यात अशा प्रकारची दुर्घटना धुळे शहरात घडू नये, यासाठी महानगरपालिका आयुक्त नितीन कापडणीस यांनी अग्निशमन अधिकारी व आरोग्य अधिकारी यांना शहरातील सर्व शासकीय, खासगी तसेच मनपा मालकीच्या वैद्यकीय आस्थापनांचे अग्निसुरक्षा ऑडीट (फायर ऑडीट) करण्याबाबत निर्देश दिले आहेत.**

धुळे महानगरपालिका क्षेत्रात नोंदणीकृत १७९ खासगी वैद्यकीय आस्थापना असून मनपा मालकीच्या वैद्यकीय आस्थापना आहेत. या सर्व आस्थापनांनी दरवर्षी फायर ऑडीट करणे आवश्यक असून, रुग्णालये व दवाखान्यांमध्ये आग प्रतिबंधक तसेच आपत्कालीन परिस्थितीत जीवितहानी टाळण्यासाठी आवश्यक असलेल्या सर्व अग्निसुरक्षा उपाययोजना कार्यान्वित असणे बंधनकारक आहे. या अनुषंगाने मनपा आरोग्य अधिकारी व अग्निशमन अधिकारी यांच्यामार्फत सर्व संबंधित वैद्यकीय आस्थापनांना नोटिसा बजावण्याची कार्यवाही सुरू करण्यात आली आहे. ज्या वैद्यकीय आस्थापनांनी अद्याप फायर ऑडीट केलेले नाही, त्यांनी नोंदणीकृत अग्निशमन व जीवसंरक्षक परिनिरीक्षकामार्फत आपल्या इमारती व परिसरातील अग्निसुरक्षा उपाययोजनांचे ऑडीट करून घेणे (पान ४ वर)



## अवैध धंद्यांच्या पुतळ्याचे दहन दबाव कुणाचा? ॲड.गोरेंचा सवाल

**धुळे, दि.१- शहर परिसरातील अवैध धंद्यांना आळा घालून त्यांच्यावर कठोर कारवाई करण्यात यावी, या प्रमुख मागणीसाठी ॲड. पंकज गोरे यांच्या नेतृत्वाखाली सुरू असलेल्या आंदोलन सहा दिवसांपासून सुरू असतानाही प्रशासनाकडून चर्चेसाठी ठोस पुढाकार घेतला जात नसल्याचा आरोप करत आंदोलनकर्त्यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली. अवैध धंद्यांच्या राक्षसाच्या प्रतिकात्मक पुतळ्याचे दहन करण्यात आले तसेच प्रशासनावर कोणाचा दबाव ? असा प्रश्नही उपस्थित करण्यात आला.** (पान २ वर)

## कर्जवाटपासाठी बँकांनी सकारात्मक दृष्टिकोनातून सहकार्य करावे- जिल्हाधिकारी भाग्यश्री विसपुते

**धुळे, दि.१- जिल्ह्यातील शेतकरी, महिला, युवक, विद्यार्थी, स्वयं-सहाय्यता गट तसेच विविध समाजघटकांच्या आर्थिक वसामाजिक प्रगतीसाठी बँकांनी सकारात्मक दृष्टिकोन ठेवून अधिकाधिक कर्जवाटप करावे. पात्र लाभार्थ्यांना कर्ज मिळण्यात अनावश्यक अडचणी येणार नाहीत याची दक्षता घेऊन विविध शासकीय योजनांच्या माध्यमातून जास्तीत जास्त अर्थसहाय्य उपलब्ध करून द्यावे, असे निर्देश जिल्हाधिकारी भाग्यश्री विसपुते यांनी दिले. जिल्हास्तरीय**



**बॅकर्स च्या सल्लागार समिती व जिल्हास्तरीय आढावा समितीची बैठक जिल्हाधिकारी श्रीमती विसपुते यांच्या अध्यक्षतेखाली झाली.**

यावेळी सहकार विभागाचे जिल्हा उपनिबंधक मनोज चौधरी, महानगरपालिकेच्या अतिरिक्त आयुक्त करुणा डहाळे, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी सुरज जगताप, जिल्हा मत्स्यव्यवसाय विकास अधिकारी जयेश बळकटे, उमेदचे प्रकल्प संचालक राजन पाटील यांच्यासह विविध शासकीय विभागांचे अधिकारी तसेच विविध बँकांचे अधिकारी व प्रतिनिधी उपस्थित होते. जिल्हाधिकारी श्रीमती विसपुते म्हणाल्या की, जिल्ह्यातील विविध समाजघटकांच्या आर्थिक सक्षमीकरणातबँकांची भूमिका महत्त्वाची आहे. रोजगार, स्वयंरोजगार, उद्योग-व्यवसाय, शेती तसेच (पान २ वर)

## निर्भयपणे समाज जिवनाचे चित्रण केले तर ते साहित्य अजरामर होईल

**धुळे, दि.१- साहित्य समाज दर्शन घडविणारे उत्तम साधन आहे. साहित्यातून नेहमीच समकालीन सामाजिक घडामोडी, समाज रचना, समाज व्यवस्था आणि मानवी जीवनाचे दर्शन घडते म्हणून साहित्यिकांनी प्रामाणिकपणे साहित्यकृतींची रचना करावी. साहित्यिकांनी निर्भयपणे समाज जीवनाचे चित्रण केले तर ते साहित्य अजरामर ठरते. मआयपन म ही अहिरानी बोलीतील उत्कृष्ट साहित्यकृती ठरावी, असे मत डॉ. एन.के. ठाकरे यांनी व्यक्त केले**

येथील महाराष्ट्र साहित्य परिषद, धुळे जिल्हा शाखा, धुळे या साहित्यिक संस्थेच्यावतीने आयपन आणि निर्मोही मा.चिं. देवरे या दोन ग्रंथांचे प्रकाशन प्रसंगी




कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचे प्रथम कुलगुरू डॉ. एन.के. ठाकरे अध्यक्षीय समारोप करताना बोलत होते. यावेळी

डॉ.एन.के.ठाकरे

महाराष्ट्राचे माजी मंत्री, विधी व कामगार कल्याण, मुंबई, डॉ. हेमंत देशमुख, म.सा.प.चे कार्याध्यक्ष डॉ. चुडामण पगारे, माजी जिल्हा प्रतिनिधी डॉ. शशिकला पवार, अथर्व प्रकाशनचे संचालक युवराज माळी, सेवानिवृत्त न्यायाधीश ॲड. जे. टी. ठाकरे, अहिराणी साहित्य परिषदेचे, अध्यक्ष प्रा. भगवान पाटील, धुळे जि.प. सदस्य पोपटराव सोनवणे, प्राचार्य व्ही.डी. सिसोदिया, डॉ. सुधीर पाटील, डॉ. शोभा शिंदे, कॉन्ट्रॅक्टर प्रकाश पाटील, प्राचार्य डी. डी. पाटील, महाराष्ट्र राजपूत समाजाचे, अध्यक्ष डॉ. दरबारसिंग गिरासे, सेवा निवृत्त मुख्याध्यापक बालेंद्र सोनवणे, महेंद्र हरी देवरे, डी. डी. देवरे आदी विविध क्षेत्रातील मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती. ग्रंथ पूजन तथा स्वातंत्र्यसैनिक स्व. माधवराव चिंधुजी देवरे आणि म निर्मोही मा. चिं. देवरे म या कादंबरीचे सहलेखक (पान २ वर)

## पातळ दुधास भेसळीने घट्ट करुन ते धुळ्यात विकणाऱ्यास जानव्यात अटक

**अमळनेर, दि.१- गायीच्या पातळ दुधास भेसळीचे घट्ट करुन ते धुळ्यात जावून विकणाऱ्या या तालुक्यातील जानवे येथील महेश दिलीप पाटील(कापडणे) (२७) जळगावच्या एफडीए च्या पथकाने जानवे-इंद्रापिंप्री रोडवरील शेड मध्ये रविवारी दुधात भेसळ करतांना रंगेहात पकडले. स्थानिक पोलीसांना सोबत घेवून ही संयुक्त कारवाई करण्यात आली असल्याचे सांगण्यात येत आहे. आरोपीस अटक करण्यात आली आहे.**

अन्न व औषध प्रशासनाचे अधिकारी आकाश बोराडे व ऋषभ चव्हाण तसेच पी.आय. दत्तात्रय निकम, पीएसआय नामदेव बोरकर, हेड कॉन्स्टेबल काशिनाथ पाटील, सुनिल तेली, विनोद संदानशीव, नितीन मनोरे,



निलेश मोरे व सागर साळुंखे यांच्या पथकाने जानवे-इंदपिंप्री रस्त्यावर असलेल्या एका पत्री शेडवर दुपारी साडेतीन वाजता छापा टाकला.

यावेळी महेश पाटील हा मिक्सरच्या सहाय्याने भेसळयुक्त दूध तयार करताना अ५५५५५५५५५ाढळून आला. चौकशीत त्याने दहा लिटर भेसळयुक्त दूध तयार करुन ते शंभर लिटर गायीच्या दुधात फॅट वाढवण्यासाठी मिसळले जात असल्याची माहिती दिली. हे दूध पुढे धुळे येथे विक्रीसाठी पाठवले जात असल्याचेही त्याने सांगितल्याचे पोलिसांनी नमूद केले आहे. कारवाईदरम्यान पोलिसांनी मिक्सर, सोयाबीन तेल, लोखंडी कॅन, गायीचे दूध आणि इतर साहित्य जप्त केले.

याप्रकरणी अन्न व औषध प्रशासन अधिकारी आकाश बोराडे यांच्या फिर्यादीवरुन महेश दिलीप पाटील याच्याविरुद्ध अन्न सुरक्षा व मानके अधिनियम २००६ मधील कलम २६(१), २७(३), ३१(१), ३१(२), ५९ तसेच भारतीय न्याय (पान ४ वर)

### युवकाचा मृतदेह तापीत आढळला

शिरपूर दि.१ (का.प्र.)- तालुक्यातील वनावल येथील २१ वर्षीय युवकाचा मृतदेह एक सप्टेंबरला सकाळी गिधाडे येथील तापी नदीपात्रात आढळला. मोहित तथा यश ज्ञानेश्वर पाटील-देवरे असे मृत युवकाचे नाव असून तो ३० ऑगस्टपासून घरातून निघून गेला होता. मोहितचे काका मनोहर देवरे यांनी पोलिसांना दिलेल्या माहितीनुसार, ३० ऑगस्टला मोहितने मित्र राकेश धनगर याला फोन करुन त्याची (पान २ वर)



## गेवराई तालुक्यातील मराठा बांधव बैलगाडी घेऊन मुंबईकडे रवाना

**बीड, दि. १ : मराठा आरक्षण आणि मराठा जात पडताळणी प्रमाणपत्राच्या मुद्द्यावरुन गेवराईतून काही मराठी बांधव आजच मुंबईकडे निघाले आहेत. विशेष म्हणजे, बैलगाडी घेऊन हे पाच ते सहा बांधव मुंबईकडे निघाले आहेत, अशी माहिती मराठा आंदोलनाचे समन्वयक गंगाधर काळकुटे यांनी दिली. मनोज जरांगे-पाटील यांनी पुन्हा आमरण उपोषण सुरू केले आहे. अंतरवाली सराटीत आज त्यांच्या उपोषणाचा चौथा दिवस होता. मराठा बांधवांनी त्यांच्या हाकेला ओ देत अंतरवाली गाठले. सरकारने मागण्या मान्य न केल्यास मुंबईकडे कूच करणार असल्याचा इशाराही जरांगे पाटलांनी दिला. त्यासाठी १२ सप्टेंबर पर्यंत वाट पाहण्याचे आवाहनही त्यांनी मराठा बांधवांना केले आहे. मात्र, आज काही समर्थक बैलगाडीने निघाले आहेत.**

गेवराई तालुक्यातील गुळज येथून पाच ते सहा जण बैलगाडी घेऊन मुंबईकडे निघाले आहेत. ते आधी अंतरवाली येथे मनोज जरांगे यांची भेट घेतील आणि तिथून पुढे मुंबईकडे निघतील, अशी माहिती गंगाधर काळकुटे यांनी दिली. मराठा आंदोलक मनोज जरांगे-पाटील यांच्या आवाहनानंतर ५ तारखेपासून १२ तारखेपर्यंत मराठा समाज बांधवांना पोहोचायचे आहे. त्यासाठी मराठे मुंबईकडे मोटारसायकल, (पान २ वर)

दिपक ज्वेलर्स
सोने- 22 K -1,41,250 रु.+3% GST
सोने- 24 K -1,53,500 रु.+3% GST
चांदी- 2,35,000 रु.+3% GST
तारगल्ली, सराफ बाजार, धुळे
फोन नं.२३३१०३/२३४१०३

### ट्रकची धडक महिला ठार

सोनगीर दि.१(प्रतिनिधी)- मुंबई-आग्रा महामार्गावरील सोनगीर शिवारात मंगळवार रोजी सकाळी ८:३० वाजेच्या सुमारास झालेल्या अपघातात निरू मुकेश बारेला (वय २५, रा. रोसर, जि. बडवाणी, मध्य प्रदेश) या महिला शेतमजुराचा दुर्दैवी मृत्यू झाला.

फिर्यादी मुकेश नवताप बारेला हे पत्नी निरू आणि दोन लहान मुलांसह आपल्या अपाचे मोटारसायकलने (एमपी ४६/ झेडएफ-६२१५) मध्य प्रदेशातील आपल्या मूळ गावी जात होते. सोनगीर शिवारातील रस्त्याचे काम सुरू असलेल्या ठिकाणी मागून येणाऱ्या भरधाव मालट्रकने (पीबी ०६/बीडी-९५९५) त्यांच्या दुचाकीला (पान २ वर)

## साडे अठ्ठावीस लाखांचा गैरव्यवहार पेट्रोल पंप मॅनेजरवर गुन्हा दाखल

**धुळे, दि.१- शहरातील देवपूर मधील एका पेट्रोल पंपावरील इंधन विक्रीतून जमा झालेल्या रक्कमेचा २८ लाख ५८ हजार ७७४ रुपयांचा गैरव्यवहार झाल्याचे नुकतेच उघडकीस आले. याप्रकरणी पश्चिम देवपूर पोलिस ठाण्यात व्यवस्थापकाविरुद्ध गुन्हा दाखल झाला.**

वाडीभोकर रोडवरील क्षीरे कॉलनीजवळील श्री स्वामी समर्थ पेट्रोलियम येथे संशयित विशाल पाटील (रा. दंडेवाले बाबा नगर, मोहाडी, धुळे) व्यवस्थापक म्हणून काम पाहत होता. पेट्रोल पंपावरील इंधन विक्रीतून जमा होणाऱ्या रकमेचा हिशोब ठेवणे व ती बँकेत जमा करण्याची जबाबदारी त्याची होती. १ जानेवारी ते ३१ जुलै या कालावधीत पेट्रोल विक्रीतून जमा झालेल्या रकमेतून २६ लाख ३९ हजार ७०० रुपयांचा गैरव्यवहार केला. कॅशबुक, बँक भरणा स्लिपवर खोटी रक्कम नमूद करीत खोटा हिशोब दिला. तसेच ३० ऑगस्टला रात्री पेट्रोल पंपाच्या कार्यालयातील २ लाख १६ हजार ७४ रुपयांची रोख रक्कम घेऊन गेला. एकूण २८ लाख ५८ हजार ७७४ या आशयाची फिर्याद व्यावसायिक जयेश खुमानसिंग ठाकूर (रा. जळगाव) यांनी फिर्याद दिली. त्यानुसार संशयित विशाल पाटील यांच्याविरुद्ध पश्चिम देवपूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला.

### कारागृहातील कैद्याचा मृत्यू

धुळे, दि.१- अंमली पदार्थ प्रतिबंधक कायद्याअंतर्गत गुन्ह्यात शिक्षा भोगत असलेल्या कैद्याचा सोमवारी (ता.३१) सकाळी जिल्हा रुग्णालयात उपचार सुरु असताना मृत्यू झाला. रूपसिंग दुर्गा पावरा (६०, रा. शिरपूर, जि. धुळे) असे त्याचे नाव आहे. प्रकृती बिघडल्याने त्याला उपचारासाठी धुळे जिल्हा रुग्णालयात दाखल केले होते.

# आपला महाराष्ट्र

## उद्योगांच्या सामाजिक दायित्व निधीवर नियंत्रण अयोग्य

महाराष्ट्रातील उद्योगांच्या सामाजिक दायित्व निधी अर्थात सी एस आर चा प्रभावी आणि पारदर्शक वापर करण्यासाठी आणि स्वत:च्या स्वयंसेवी संस्थांच्या माध्यमातून उद्योगांकडून होणारा गैरवापर रोखण्यासाठी महाराष्ट्र शासनाने या निधीचे नियंत्रण स्वत:च्या अखत्यारित ठेवण्याचे निर्णय घेण्याच्या दृष्टीने हालचाली सुरू केलेल्या आहेत. त्यासाठी महा सीएसआर प्राधिकरण स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे. शासन याबाबतचा प्रस्ताव लवकरच मंजूर करणार आहे. सामाजिक दायित्वाच्या अंतर्गत शिक्षण, आरोग्य, ग्रामीण विकास, पर्यावरण अशा उपक्रमांवर खर्च करण्याचे बंधन उद्योगांना आहे. २०१४ पासून तसा कायदा अमलात आलेला असून हा निधी यापुढे कंपन्यांना स्वत:च्या पद्धतीने खर्च करता येणार नाही. कंपन्या आपल्याच फायद्यासाठी स्वत:च्या स्वयंसेवी संस्था निर्माण करून सी एस आर चा निधी वापरत असल्याचे सरकारचे म्हणणे आहे. यात काही अंशी तथ्य असू शकते परंतु सरसकट सर्व कंपन्यांना आता महा प्राधिकरणात निधी वळता करावा लागणार आहे. या कंपन्यांशी काही स्वयंसेवी संस्था किंवा विधायक कार्य करीत असलेल्या संस्था थेट संपर्क साधून सीएसआर ची मागणी करत असत. त्यामुळे अनेक उपक्रमांना मदत झालेली आहे. आता ती होणार नाही कारण सरकारचे त्यावर नियंत्रण येणार असल्यामुळे शासक पक्ष आणि मित्र पक्षांच्या लोकप्रतिनिधींचे संबंध असणाऱ्या संस्थांनाच हा निधी वितरित करण्यात येईल हे उघड आहे. जर सेक्युलर आणि विधायक उपक्रम राबविणाऱ्या संस्थांनी या निधीची मागणी मध्यवर्ती संस्थेकडे केली तर संबंधित संस्थांना अर्बन नक्षलवादी ठरवून त्यांची मागणी फेटाळली जाईल हा धोका यात आहे.

कंपन्यांच्या निधीचे केंद्रीकरण करून सरकार कंपन्यांच्या किंवा उद्योगांच्या स्वायत्ततेवर तसेच स्वातंत्र्यावर टाच आणू पाहत आहे. मात्र या लोकशाही विरोधी निर्णयाच्या विरोधात कंपन्या उभ्या राहणार नाहीत. कारण आधीच आजच्या राजकीय व्यवस्थेपुढे त्या नतमस्तक झालेल्या आहेत. त्यांना आपला व्यवसाय चालवायचा असल्यामुळे सरकार जे सांगेल ते मान्य करण्याशिवाय अन्य पर्याय त्यांच्यापुढे नाही. परिणामी हा निर्णय सुद्धा त्यांना लादून घ्यावा लागेल. काही संस्था शतक ओलांडलेल्या असल्या तरी त्यांनाही मदत करण्यात येणार नाही अशी शक्यता अधिक आहे. या निधीत यापुढील काळात राजकारण शिरणार असल्याची भीती अनेकांना वाटते. हजारो कोटी रुपयांची कर्जे लहान मोठ्या अनेक उद्योजकांनी बुडवली आहेत आणि त्यांच्यावर कुठलीही कारवाई करण्यात आलेली नाही. अशा तऱ्हेने ते मिंधे असल्यामुळे सरकारच्या कुठल्याही दडपशाहीच्या भूमिके विरुद्ध उभे राहू शकत नाहीत. यात खऱ्या अर्थाने काम करणाऱ्या स्वयंसेवी संस्थांचे नुकसान आहे. सध्या सर्वच क्षेत्रात धर्म आणि विभाजन वादाची भूमिका राजकीय क्षेत्रातून घेण्यात येत असल्यामुळे लोकशाही संकल्पनाच धोक्यात येऊ पाहत आहे. कंपन्यांवर नियंत्रण हा देखील संवैधानिक मूल्यांची गळचेपी मानली जाते. सी एस आर ची संकल्पना केवळ उद्योगांनी समाजाला केलेली आर्थिक मदत नसून उद्योग ज्या समाजातून निर्माण होतात त्या समाजाप्रती त्यांचे काही सामाजिक उत्तरदायित्व आहे या भावनेतून ती संकल्पना पुढे आलेली आहे. अनेक क्षेत्रात काम करणाऱ्या स्वयंसेवी संस्थांना या निधीमुळे मोठा आधार मिळतो. सरकारने मध्यवर्ती निधी वितरण संस्था निर्माण न करता जिल्हा निहाय अनेक क्षेत्र निहाय गरजांचा डेटा तयार करावा. त्यात विश्वासार्ह स्वयंसेवी संस्थांची स्वतंत्र आणि पारदर्शक नोंदणी करावी. कंपन्यांना त्या माहितीच्या आधारे प्रकल्प निवडण्याचे स्वातंत्र्य द्यावे. ते स्वातंत्र्य अबाधित ठेवण्याची जबाबदारी सरकारची आहे. त्या ऐवजी सरकारच जर नियंत्रण ठेवत असेल तर ती बाब योग्य होणार नाही.

या निधीच्या वापराचे सार्वजनिक लेखापरीक्षण असावे आणि वेबसाईटवर त्याचा तपशील उपलब्ध असावा. पैसा कुठून आला आणि कुठे खर्च झाला ते नागरिकांना कळले पाहिजे. अशी व्यवस्था निर्माण करून सरकारने समन्वय साधावा आणि कंपन्यांचे निर्णय स्वातंत्र्य देखील अबाधित ठेवावे अशी अपेक्षा आहे.ही जबाबदारी पार पाडताना सरकारची भूमिका मार्गदर्शकाची असावी मालकाची नव्हे. कोणत्याही सामाजिक कार्याची ताकद ही केंद्रीकरणात नसते तर ती समाजातील विविध संस्था उद्योग आणि नागरिक यांच्या सहभागातून तयार होत असते. म्हणूनच दायित्व निधी कुणाच्या मर्जीने खर्च होणार आणि त्या मर्जीवर कोणाचे नियंत्रण असणार असा मुद्दा आहे. जेवढी पारदर्शकता आणि राजकीय हस्तक्षेपांपासून ही व्यवस्था मुक्त असेल तितकीच समाजाची जबाबदारी देखील ठरणार आहे अन्यथा सीएसआर च्या नावाखाली उद्योगांचे सामाजिक दायित्व सरकारी नियंत्रणाखाली आणण्याचा प्रयत्न म्हणून तिच्याकडे पाहिले जाईल आणि एकदा निधीचे केंद्रीकरण झाले की त्याचे राजकीय केंद्रीकरण झाल्याशिवाय राहणार नाही. शासनाची मध्यवर्ती संस्था हा निधी गोळा करणार असेल आणि त्यानंतर कोणत्या संस्थेला किती निधी द्यायचा हे ठरवणार असेल तर संस्थांची निवड कोण करणार आणि त्यासाठी कोणते निकष लावले जाणार त्या निकषांची माहिती सर्वांसाठी उपलब्ध असेल काय असे अनेक प्रश्न यातून निर्माण होणार आहेत. राजकीय किंवा प्रशासकीय दबावातून संबंधित व्यवस्था मुक्त राहणार नसल्यामुळे सरकार निधी गोळा करणार, सरकारच संस्थांची यादी तयार करणार, सरकारच निधीचे वितरण करणार, सरकारच ऑडिट करणार तर मग कोण विचारणार असा सगळा हा गुंता आहे. म्हणून सरकारने या उद्योगात पडू नये हेच श्रेयस्कर ठरेल.

उद्योगांचा सामाजिक दायित्व निधी हा काही कुठल्या राजकीय पक्षाचा पैसा नाही. तो अनेक उद्योगांच्या नफ्यातून वेगळा काढण्यात येतो. कंपनीने कोणत्या क्षेत्रातील संस्थेसोबत करार करावे, कोणत्या संस्थेसोबत काम करावे, कुठल्या प्रकल्पाला मदत करावी, त्यांचे निष्कर्ष कसे तपासावेत यासंबंधीचा सर्व निर्णय कंपन्या घेतात तो त्यांचा अधिकारच आहे. एखाद्या कंपनीला एखाद्या गावात किंवा शहरात शिक्षणाचे महत्व वाटत असेल, एखाद्या कंपनीला आरोग्याचे क्षेत्र महत्त्वाचे वाटत असेल, एखादी कंपनी जलसंधारणाच्या कामात मदत करण्याची इच्छा ठेवत असेल तर कंपन्या खात्रीशीर संस्थांना मदत करू शकतात. तो प्रघात असून आतापर्यंत अनेक कंपन्यांनी तशी मदत विधायक संस्थांना केलेली आहे. सरकारने जरूर या कंपन्यांच्या निधीच्या वापराचा आढावा घ्यावा, त्यासंबंधीचे मार्गदर्शन करावे, काही शिफारशी देखील कराव्यात परंतु संपूर्ण अधिकार जे कंपन्यांचे आहेत ते आपल्या ताब्यात घेऊ नयेत. अशीच उद्योग क्षेत्रातील अनेकांची भूमिका आहे. समन्वय करणे किंवा असणे वेगळे आणि नियंत्रण असणे वेगळे या सीमारेषेच्या पलीकडे जाऊन सरकार हा निधी आपल्या अधिपत्याखाली आणू इच्छिते या निर्णयाचे कोणीही अपवाद वगळता स्वागत करणार नाही.

आपल्या देशात आणि राज्यात स्वयंसेवी संस्थांनी सरकारच्या पुढे जाऊन अनेक क्षेत्रात भरीव कामगिरी केलेली आहे. दुर्गम भागातील शिक्षण असेल, आदिवासींचे आरोग्य असेल, त्यांच्या अधिकाराबाबतचे प्रबोधन असेल, अपंगांसाठीचे काम असेल, दूर्धर आजारांवर मात करण्याचा मुद्दा असेल, महिलांचे सक्षमीकरण आणि बालकांच्या आरोग्याचा प्रश्न असेल अशा अनेक क्षेत्रात स्वयंसेवी संस्था वर्षानुवर्षे काम करीत आहेत. त्यांना कंपन्यांनी परस्पर मदत केली तर काही बिघडणार नाही. आतापर्यंत तसे काही बिघडलेले नाही. मग आत्ताच सरकारला त्याबद्दलच्या अडचणी का वाटतात हा प्रश्न असून कोणाच्यातरी डोक्यातून दायित्व निधीवर नियंत्रण ठेवावे अशी योजना निपजली असेल. त्याचीच अंमलबजावणी सरकार करणार असल्याचे दिसते. ही बाब गैर आहे. सामाजिक दायित्व निधीच्या वितरणा संबंधात समन्वय ठेवण्यास कोणी विरोध करणार नाही. मात्र सीएस आर वरील निर्णय स्वातंत्र्य आणि निधी वाटपाची स्वायत्तता हिरावली जाऊ नये अशीच विधायक क्षेत्रात काम करणाऱ्या व्यक्तींची, संस्थांची आणि उद्योजकांची इच्छा आहे. सरकारने या संदर्भात जरूर विचार करावा अशी अपेक्षा आहे.

### आ.भदाणेंचा वाढदिवस शैक्षणिक पॅडचे वाटप

धुळे, दि.१- धुळे तालुक्यातील निमगुळ गणासह बाबरे (ता.धुळे) येथे आमदार राघवेंद्र (रामदादा) पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त ममाझा नेता, माझा अभिमान - सेवा सप्ताहफ अंतर्गत विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक पॅडचे वाटप करण्यात आले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी बाबरे येथील ज्येष्ठ नागरिक दगा चंद्रसिंग राजपूत होते.

विद्यार्थ्यांना शैक्षणिक लेखनासाठी आवश्यक साहित्य उपलब्ध व्हावे, त्यांच्या शैक्षणिक प्रगतीला चालना मिळावी आणि विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणाची गोडी निर्माण व्हावी या उद्देशाने हा सामाजिक उपक्रम राबविण्यात आला. ज्ञानाची साथ, प्रगतीची वाट या संकल्पनेतून विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी हा उपक्रम आयोजित करण्यात आला होता.

यावेळी बाबरेचे सरपंच प्रवीण राजपूत, विविध कार्यकारी सोसायटीचे चेअरमन आनंदा भालेकर, विठ्ठल नथू मराठे, पोलीस पाटील आनंदा गायकवाड, गोकुळ काळे, बबुतसिंग राजपूत, भारतीय जनता पार्टीचे शाखाप्रमुख विनोद भालेकर अमोल, राजपूत, संभाजी भालेकर, योगेश राजपूत, पंकज राजपूत, अविनाश राजपूत, जितेंद्र राजपूत, आनंदा मोरे, आनंद राजपूत, नितीन मोरे, विशाल राजपूत, आबा रायसिंग मोरे, नर्सिंग मोरे, अमोल राजपूत (बाबरे), राहुल अजबराव पाटील (धामणगाव), परिसरातील मान्यवर व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. या उपक्रमाचे आयोजन सामाजिक कार्यकर्ते दिलीप सूर्यवंशी, प्रशांत अजबराव पाटील (धामणगाव) व बोरी परिसरातील कार्यकर्त्यांनी केले.

### काळखेड्यातून कांदे व वायर लांबवली

धुळे, दि.१- काळखेडा (ता. धुळे) गाव शिवारात शेतातून चोरट्यांनी ६४० किलो कांदे, वीज वायर चोरून नेली. प्रकाश एकनाथ पाटील (६५) यांचे गाव शिवारात शेत आहे. शेतात काही दिवसांपूर्वीच कांदा काढून गोण्यांमध्ये भरून ठेवलेला होता. सोमवारी (ता. ३१) सकाळी चोरीचा प्रकार उघडकीस आला.

चोरट्यांनी १६ गोण्यांमध्ये भरलेले एकूण ६४० किलो कांदे, ७०० फूट लांबीची वीज वायर चोरून नेली. चोरीस गेलेल्या मालाची एकूण किंमत २३ हजार १०० रुपये आहे. सोमवारी पहाटेपूर्वी चोरी झाल्याचा अंदाज आहे. प्रकाश पाटील यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार धुळे तालुका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला. हवालदार सोनवणे तपास करीत आहेत.

### हबीबी व मुहम्मद सिद्दीक विद्या.चे यश

धुळे, दि.१- ईद मिलाद सणाच्या निमित्ताने, नौजवानान-ए-इस्लामपुरा देवपूर धुळे यांच्या वतीने पैगंबर मुहम्मदच्या स.च्या पवित्र जीवनावर आधारित ऑल धुळे उर्दू वक्तृत्व स्पर्धा एल.एम. सरदार उर्दू हायस्कूलच्या प्रांगणात घेण्यात आली.

या स्पर्धेत विद्यार्थ्यांचे दोन गट करण्यात आले होते सहावी, सातवी ज्युनिअर आणि आठवी, नववी सिनिअर गट. या दोन्ही गटांमध्ये डॉ. अब्दुल तव्वाब अन्सारी एज्युकेशनल अँड वेल्फेअर सोसायटीच्या हबीबी उर्दू प्रायमरी स्कूल आणि मुहम्मद सिद्दीक उर्दू हायस्कूलच्या विद्यार्थ्यांनीही भाग घेतला.

सिनियर गटामध्ये, श्रीमती शिमा इलियास यांच्या मार्गदर्शनाखाली, आठवीचा विद्यार्थी अबुलआस समीर याने प्रथम क्रमांक पटकावला. ज्युनिअर ग्रुपमध्ये जमील हनीफ यांच्या मार्गदर्शनाखाली इयत्ता सातवीची विद्यार्थिनी मुनज्जा यासीन हिने अवैध कमाईचे दुष्परिणाम या विषयावर प्रभावी भाषण करत उत्तेजनार्थ पारितोषिक पटकावले. स्पर्धेत सहभागी विद्यार्थी आणि मार्गदर्शक शिक्षकांना मुख्याध्यापक जमील साबिर आणि मुख्याध्यापिका स्वालिहा इलियास यांचे मार्गदर्शन लाभले.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शाबान ताहिर, शाहिद नूरानी, शाहिद किब्रिया, अख्तर नूरानी, वसीम इस्माईल, मन्सूर गुलाम हुसैन, शफीक अनीस यांनी परिश्रम घेतले.

या उपाक्रमाबद्दलसंस्थेचे अध्यक्ष, चेअरमन डॉ. मसूद अहमद अन्सारी, आणि सचिव डॉ. गुलाम मुस्तफा, सर्व सदस्य यांनी अभिनंदन केले.

**रक्तदान हेच सर्वश्रेष्ठ दान**

पान १ वरुन

### निर्भयपणे समाज जिवनाचे चित्रण

स्व. रमेश माधवराव देवरे यांच्या प्रतिमांना माल्यार्पण करून कार्यक्रमाची सुरुवात केली. माधवराव चिंधूजी देवरे यांनी आष्टीचा जंगल सत्याग्रहाचे नेतृत्व त्यांनी केले होते. यानंतर मात्र माधवराव चिंधुजी देवरे हे भूमिगत स्वातंत्र्यसैनिक म्हणून कार्य करीत होते. १४ एप्रिल १९४४ च्या साळवे येथील खजिना लुटी प्रकरणात त्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली होती. देश स्वतंत्र झाल्यावर पिंपळनेरच्या पश्चिम आदिवासी पट्ट्यामध्ये १२५ वॉलेटरी शाळा काढून शिक्षण क्षेत्रात भरीव कामगिरी त्यांनी केली, अशी माहिती डॉ. हेमंत देशमुख यांनी दिली. पुढे ते म्हणाले, कृषी प्रधान भारतातील शेतकरी हा दुर्लक्षित घटक आहे, याकडे शासनाचे लक्ष द्यायला हवे, असेही ते म्हणाले. दोन्ही ग्रंथांचे लेखक प्राचार्य डॉ. संजीव गिरासे यांनी लेखकाची भूमिका व्यक्त केली. त्याचबरोबर निर्मोही कादंबरीचे सहलेखक स्व. रमेश माधवराव देवरे यांच्या वतीने राज भास्करराव देवरे यांनी लेखन भूमिका मांडली. कार्यक्रमाच्या प्रारंभी स्वागत गीत आणि अखेर पसायदान प्रा. डॉ. उज्ज्वला वाणी यांनी सादर केले. प्रास्ताविक डॉ. सदाशिव सूर्यवंशी यांनी केले. आयपन ग्रंथाचे अभिवाचन इंजि. ऋषीराज राजपूत यांनी तर निर्मोहीचे अभिवाचन डॉ. ऋतुजा राजपूत यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रा. डॉ. विजय जाधव, प्रा. डॉ. वाल्मीक आढावे, प्रा. डॉ. योगेश पाटील, ड. जसवंत राजपूत, राजेंद्र राजपूत, हितेंद्र राजपूत, दिव्या राजपूत, उज्ज्वला देवरे, विनायक देवरे, सुरज साळुंखे, निखिल पाटील, शैलेंद्र राजपूत, किरण देवरे, अनिल सिसोदे, संजय राजपूत, बाळासाहेब तोरवणे, आदींनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. सुनील पवार यांनी तर आभार प्रा. डॉ. सुरेंद्र मोरे यांनी मानले.

### युवकाचा मृतदेह तापीत आढळला

मोटारसायकल गिधाडे येथील पुलावर लावली असून ती घेऊन जा, मी जात आहे असे सांगितले. राकेशने मोहितचे काका मनोहर देवरे यांना माहिती दिली. त्यानंतर देवरे यांनी पुतण्याशी संपर्क साधण्याचा प्रयतक केला. मात्र त्याचा मोबाईल बंद होता. त्यामुळे कुटुंबियांनी परिसरात त्याचा शोध सुरु केला. शहर पोलिस ठाण्यात माहिती दिल्यावरुन बेपत्ता नोंद करण्यात आली. दरम्यान, एक सप्टेंबरला सकाळी गिधाडे येथील तापी पात्रात युवकाचा मृतदेह तरंगतांना आढळला. देवरे कुटुंबाला त्याबाबत माहिती मिळताच ते घटनास्थळी पोहचले. त्यांनी मृतदेह मोहितचा असल्याची खात्री पटवली. मोहित दोंडाईचा येथील डिप्लोमाचा विद्यार्थी होता. त्याच्यावर एक सप्टेंबरला दुपारी वनावल येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. तो वनावल (ता.शिरपूर) येथील अरुण पुंडलिक देवरे यांचा नातू, ज्ञानेश्वर देवरे यांचा मुलगा होता.

### गेवराई तालुक्यातील मराठा बांधव

बैलगाडी, ट्रॅक्टर, टेम्पो, ट्रकसह मिळेल त्या गाडीने मुंबईकडे निघाले असून आपल्या पाहुण्यांकडे जाऊन राहणार आहेत. तसेच पार्किंग असेल तिथे वाहन आणि या बैलगाड्या लावणार असल्याचे गंगाधर काळकुटे यांनी सांगितले. आम्ही मुंबईच्या आसपासच्या परिसरात जाणार आहोत. ज्यावेळेस मनोज जरांगे मुंबईत पोहोचतील, त्यावेळेस मराठे बांधव मनोज जरांगे सांगतील तिथे आझाद मैदान किंवा वर्षा बंगल्यावरही जाऊ शकतात, असेही काळकुटे यांनी म्हटले.

**ओबीसींचा मोर्चा अयशस्वी ठरला**

लक्ष्मण हाके ओबीसींच्या समस्या मांडायला गेले असते, काही मागायला गेले असते तर भेटले असते. पण, ते मराठा समाजाच्या आरक्षणाला विरोध करायला जात असल्याने त्यांचा डाव यशस्वी होणार नसल्याची टीका मराठा समन्वयक गंगाधर काळकुटे यांनी केली. मुंबईला हाके निघाले तरी त्यांना रिस्पॉन्स नाही, त्यांच्यात छगन भुजबळांची भूमिका वेगळी आहे. वाघमारे यांची वेगळी भूमिका आहे, कुणीही त्यांच्यासोबत नाही. कारण, ते मराठ्याला विरोध करण्यासाठी जात आहेत. हाकेंच्या आंदोलनात सामान्य ओबीसी येणारही नाहीत. त्यांनी भूलथापा देत गाड्या घेऊन काही लोक आणले आहेत. ओबीसींचा मोर्चा फेल गेला, असेही गंगाधर काळकुटे यांनी म्हटले.

### ट्रकची धडक महिला ठार

कट मारला.या धडकेमुळे दुचाकीवरून खाली पडलेल्या निरू बारेला यांच्या कमरेवरून ट्रकचे चाक गेल्याने त्या गंभीर जखमी झाल्या. सोनगीर ग्रामीण रुग्णालयात दाखल केले असता डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले. सुदैवाने त्यांच्या दोन लहान मुली बचावल्या आहेत.अपघातानंतर पळून गेलेल्या ट्रकचालक कुलदीप सिंग परगत सिंग (रा. बुह, जि. तरन, पंजाब) याला नरडाणा पोलीस ठाण्यात ट्रकसह ताब्यात घेण्यात आले. सोनगीर पोलीस ठाण्यात आरोपी चालकाविरोधात निष्काळजीपणा आणि अपघातास कारणीभूत ठरल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पान १ वरुन

### कोपर्ली ग्रा.पं.च्या भ्रष्टाचाराची चौकशी

**काळ वातावरण तणावपूर्ण बनले.**

कोपर्ली ग्रामपंचायतीतील विकास कामांमध्ये अनियमितता झाल्याचा आरोप सामाजिक कार्यकर्ते तथा तक्रारदार रवींद्र एकनाथ अहिरे आणि काही ग्रामस्थांनी केला आहे. या प्रकरणाकडे प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी अहिरे यांनी अलीकडेच जिल्हाधिकारी कार्यालयासमोर बेमुदत उपोषण सुरू केले होते. प्रशासनाकडून चौकशी समिती स्थापन करण्याचे आश्वासन देण्यात आल्यानंतर त्यांनी उपोषण मागे घेतले होते.

त्यानुसार सहाय्यक गटविकास अधिकारी विजय पाटील, जिल्हा परिषद बांधकाम उपविभाग, धडगाव येथील गिरीश खैरनार आणि विस्ताराधिकारी चंद्रकांत दशपुते यांच्या समितीने कोपर्ली ग्रामपंचायतीच्या कार्यालयात प्रत्यक्ष भेट देत चौकशी केली. चौकशीदरम्यान ग्रामपंचायत कार्यालयातील विविध विभागांमधील दप्तर, विकास कामांशी संबंधित कागदपत्रे, निधीचा वापर तसेच तक्रारदारांनी उपस्थित केलेल्या विविध मुद्द्यांची अधिकाऱ्यांनी पाहणी केली.

चौकशीदरम्यान कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी तालुका पोलिस ठाण्याचे पोलिस उपनिरीक्षक भामरे यांच्या

### अवैध धंद्यांच्या पुतळ्याचे दहन

आंदोलनाला सहा दिवस उलटले तरीही चर्चेला प्रशासनाची तयारी नाही? अवैध धंद्यांचे काही पत्ते बातमीद्वारे जाहीर केले असून त्यावर काही ही कारवाई नाही. प्रशासनाला कोणाची भीती? अवैध धंदे करणाऱ्यांची का कोण पुढाऱ्याची? जागे व्हा..

अवैध धंद्यांविरोधात आवाज उठवत ॲणड. पंकज गोरे यांनी आंदोलन सुरू केले आहे. या आंदोलनादरम्यान प्रशासनाने नागरिकांच्या आणि आंदोलनकर्त्यांच्या मागण्यांची दखल घ्यावी, संबंधित अधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष चर्चा करावी आणि अवैध धंद्यांवर प्रभावी कारवाई करावी, अशी भूमिका आंदोलनकर्त्यांनी घेतली आहे.

मात्र आंदोलनाला सहा दिवस पूर्ण होऊनही प्रशासनाकडून अद्याप ठोस कारवाई नाही. सामान्य जनतेवर अथवा व्यावसायिकांवर कारवाई प्रसंगी जी तत्परता दाखवता. ती अवैध काळे धंदे करणाऱ्यांविरोधात का नाही? प्रशासन नेमकी कोणती भूमिका घेत आहे आणि आंदोलनकर्त्यांशी संवाद साधण्यास विलंब का होत आहे, असा प्रश्न उपस्थित करण्यात येत आहे.

अवैध धंद्यांच्या प्रश्नावर प्रशासनाने पारदर्शक भूमिका स्पष्ट करावी, नागरिकांच्या तक्रारींची दखल घ्यावी आणि संबंधितांवर कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी आंदोलकांनी केली आहे. आंदोलन करतांना ॲड.गोरेंसह संदीप चौधरी, गोकुळ बडगुजर, पंकज भारस्कर, संजय पाटील, निलेश चौधरी, सागर निकम, सुरज भावसार, मनोज गवळी, अजय चौधरी, सोमनाथ जयस्वाल, बंटी गोरे, स्वप्नील सोनवणे, विपुल भारस्कर, गोकुळ येलमामे, दर्शन खंबायत, सौरभ जवराळ, मुकेश जाधव, ज्ञानेश्वर देवरे, प्रवीण पाटील, हर्षल वाणी, सिद्धार्थ गोरे, अक्षय लाड यांच्या सह आंदोलक उपस्थित होते.

### कर्जवाटपासाठी बँकांनी सकारात्मक दृष्टिकोनातून

शिक्षणासाठी पात्र लाभार्थ्यांना आवश्यक कर्ज उपलब्ध करून द्यावे. विशेषतः विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी आवश्यक कर्ज सुलभतेने उपलब्ध करून देण्यासाठी बँकांनी सहकार्य करावे. ज्या बँकांचे विविध योजनांमधील कर्जवाटप कमी आहे, त्यांनी संबंधित प्रकरणांचा नियमित पाठपुरावा करून कर्जवाटप वाढवावे. बँकांच्या शाखांमध्ये विविध कर्ज योजना, पात्रता, आवश्यक कागदपत्रे आणि कर्ज मंजुरी प्रक्रियेची माहिती नागरिकांना सहज समजेल अशा पद्धतीने सुस्पष्ट सूचना फलकावर प्रदर्शित करावी. कर्ज प्रस्तावांमध्ये त्रुटी असल्यास संबंधित अर्जदारांना त्याची स्पष्ट माहिती द्यावी. पात्र प्रकरणे विनाकारण प्रलंबित ठेवू नयेत. बँका आणि संबंधित शासकीय यंत्रणांनी परस्पर समन्वयातून काम करून योजनांची उद्दिष्टपूर्ती करावी, असेही त्यांनी सांगितले.

**खरीप पीक कर्जाचे ५७.३८ टक्के वितरण**

सन २०२६-२७ मध्ये धुळे जिल्ह्यासाठी खरीप पीक कर्ज वितरणाचे ८९६.५२ कोटींचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे. त्यापैकी ३१ जुलै, २०२६ अखेर ५१४.३८ कोटींचे पीक कर्ज वितरित करण्यात आले असून ५७.३८ टक्के उद्दिष्टपूर्ती झाली आहे. यामध्ये सहकारी तथा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांसाठी खरीप पीक कर्जाचे २३४.८७ कोटींचे उद्दिष्ट असून २०५.७३ कोटींचे वितरण करण्यात आले आहे. ही कामगिरी ८७.६० टक्के आहे. महाराष्ट्र ग्रामीण बँकेनेही ७८.३० टक्के उद्दिष्टपूर्ती केली आहे.



### जाहीर नोटीस

तमाम जनतेस या टायटल जाहिर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की,

मौजे धुळे ता.जि.धुळे येथील स.नं.४६४/२अ पैकी प्लॉट नं.३४ चे क्षेत्र २९८.९० चौ.मी. बखळ प्लॉट. यास विस्तारित सि.स.नं.७०४० चे क्षेत्र २९४ चौ.मी. सत्ताप्रकार क असा लागलेला आहे. यासी चतु:सिमा

पूर्वेस- ६ मी. रस्ता, पश्चिमेस- प्लॉट नं.३१,

दक्षिणेस- प्लॉट नं.३५, उत्तरेस- प्लॉट नं.३३ गोयल यांचे घर

येणेप्रमाणे वर्णन असलेली मिळकतीचा आमचे अशिल यांनी मिळकतीचे मालक श्री शिरीष चुनीलाल वाणी रा. घर नं.१२२० गल्ली नं.४, बँक ऑफ महाराष्ट्र समोर, धुळे यांचेशी कायम खरेदी करणेचा सौदा केलेला आहे व बयाणा रक्कम दिलेली आहे.

सबब तमाम लोकांना या जाहिर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, सदर मिळकतीत कोणाचेही कोणत्याही स्वरुपाचे जसे सौदा, करार, बक्षीस, अदलाबदल, गहाण, लिज, लिन, लिव्ह ॲण्ड लायसन्स, भाडेपट्टा, वारस हक्क, मुखत्यार, मृत्युपत्र, वहिवाट, बोजे, ऋणभार, ताबा, आरक्षण, जप्ती, खरेदी-विक्री, न्यायिक व इतर प्रकरणे अथवा इतर कोणत्याही स्वरुपाचे हक्क व अधिकार असतील तर त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ७ (सात) दिवसांच्या आत खालील नमुद पत्यावर पुराव्यानिशी लेखी हरकती नोंदवाव्यात. टपाल व फोनवर तसेच परस्पर वर्तमानपत्रात दिलेल्या हरकती मान्य होणार नाही. तसेच दिलेल्या मुदतीत कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास सदर मिळकत आमचे अशिलांनी खरेदी करण्यास कोणाचीही काही एक हरकत नाही, तसेच सदर मिळकत ही निर्बोज व हस्तांतरणीय आहे, असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील याची नोंद घ्यावी.

सदरची जाहिर नोटीस आमचे पक्षकाराने दिलेल्या माहितीवरुन व सांगितलेवरुन त्यांचे वतीने आमचेमार्फत प्रसिध्दीस दिली असे.

धुळे, दिनांक- ३१/०८/२०२६.

**ॲड.रोहित राजकुमार छाबिडया**

ब्लॉक नं.आर/२, रूम नं.१, कुमार नगर, साक्री रोड, धुळे.

**मो.नं.९९२२८२८८८३, ७४९९९९८९५५**

### जाहीर नोटीस

प्रोसेस जमा.
एम.ए.सी.पी.नं.३६५/२०२३

ॲड.बी.जी.चिताळकर
निशाणी नं. १०

**नाशिक येथील मे. मोटार ॲक्सीडेंट क्लेम ट्रिब्युनल साहेब, नाशिक (Adhoc-D-1). यांचे कोर्टात**

**श्रीमती अंजनाबाई बाबुराव डावरे**

रा.जळगांव निंबायती ता. मालेगांव जि. नाशिक... अर्जदार

विरुद्ध

**१. श्री. दिनेशचंद्र बडिया ठाकूर**

रा. बडिया,चिवल्यावाड,बाफना हॉस्पिटल जवळ,

साक्री रोड, धुळे ४२४००१ .... सामनेवाले

ज्याअर्थी नमूद क्लेम अर्ज हा अर्जदार यांनी तुम्ही सामनेवाले नं. १ विरुद्ध दि. ३०/०१/२०२३ रोजी झालेल्या अपघातात मयत बाबुराव राघो डावरे, यांचे अकाली अपघाती मृत्यूची नुकसान भरपाई मिळणे करीता मे. कोर्टात दाखल केलेला आहे. व ज्याअर्थी तुम्ही सामनेवाले नं.१ यांना नमूद रजि. पत्त्यावर नोटीस पाठवून देखील नोटीस बजावणी होत नाही. त्याअर्थी सामनेवाले नं. १ यांनी स्वत: अगर वकिलामार्फत मे.कोर्टात १७/०९/२०२६ रोजी सकाळी १०.३० वाजता समक्ष हजर होवून तुमचे म्हणणे सादर करावे. अन्यथा तुमचे काही एक म्हणणे नाही असे गृहीत धरुन तुमचे विरुद्ध एकतर्फा हुकूम करण्यात येईल. याची नोंद घ्यावी.

सदर नोटीस आमचे सहीनिशी व कोर्टाचे शिक्क्यानिशी दिली असे.... सही.... सही....

**कामगिरी लिपीक** — मो.अप.प्राधिकरण,नाशिक (Adhoc-D-1).

(कोर्टाचा शिक्का)

**अधिक्षक** — मो.अप.प्राधिकरण,नाशिक

### जाहीर नोटीस

तमाम लोकांना सर्व वित्तीय संस्था, बँका, पतसंस्था यांना जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, धुळे म. न. पा. हद्दीतील मौजे महिंदळे येथील स. नं. ८८/२/अ पैकी प्लॉटनं. ५५ चे एकूण क्षेत्र १५० चौ. मी. या पैकी उत्तरेकडील भागाचे क्षेत्र ७५ चौ. मी. यास वि. सि.स.नं. ५९२३ सत्ता प्रकार क चे एकूण क्षेत्र १४४ चौ. मी. या पैकी उत्तरेकडील भागाचे क्षेत्र ७२ चौ. मी. बखळ प्लॉट यासी चतु:सिमा पुर्वेस : प्लॉट नं. ४८, पश्चिमेस : रस्ता ६ मी., दक्षिणेस : याच प्लॉट नं. ५५ चा उर्वरित भाग, उत्तरेस : प्लॉट नं. ५४.

येणे प्रमाणे वर्णनाच्या व चतु:सिमेच्या आतील मिळकत बखळ प्लॉट हा सौ. उज्वला देवेंद्र पाटील रा. ५, सत्यसाईबाबा सोसा. साक्री रोड, धुळे यांचे मालकीचे ताबे उपभोगातील आहे. सदर वरीलप्रमाणे मिळकत ही आमचे अशिल यांनी कायम खरेदीने विकत घेण्याचा सौदा केलेला आहे व त्यापोटी बयाणा रक्कम दिलेली आहे. लवकरच आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करणार आहेत.

तरी तमाम लोकांना सर्व वित्तीय संस्था, बँका, पतसंस्था, यांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, सदर मिळकतीवर कोणाचीही कोणत्याही प्रकारे हरकत असल्यास तसेच मिळकत हक्क, हिस्सा, टांच, गहाण, बक्षिस, जप्ती, बोजा, पतपेढी, जनरल मुखत्यार हक्क, मृत्यूपत्र, सौदा पावती, बोजा, खावटी हक्क, कोर्ट कचेरी, असे कोणत्याही प्रकारचे हक्क किंवा हितसंबंध असल्यास लेखी हरकत किंवा तक्रार ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ८ दिवसांच्या आत खालील पत्त्यावर कळवावी. मुदतीत हरकती अगर तक्रारी न आल्यास आमचे अशिल सदरहू मिळकतीचा खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर येणाऱ्या हरकती अगर तक्रारी आमच्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाही.

सदरची नोटीस आमच्या अशिलांच्या सुचनेवरुन आमचे मार्फत प्रसिद्धीस दिली आहे

ठिकाण : धुळे दि. १/०९/२०२६

**ॲड. प्रमोद एम. चौधरी**

११४, गोविंदा अपार्टमेंट, देवपूर धुळे मो. ९८६०७०६१७१

### जाहीर नोटीस

ॲड.डी.एम.राऊळ, शहादा, ता.शहादा, जि.नंदुरबार
मो.नं.९५६१४९९५५५

**शहादा येथील म.दिवाणी न्यायाधिश सो., (स्तर) यांचे कोर्टात**

दि.कि.अर्ज नं.३३९/२०२६

श्री.जगदीश अशोक लोहार, उ.व.३५, धंदा- शेती,
रा.सोनवद, त.श. ता.शहादा, जि.नंदुरबार. ....अर्जदार

विरूध्द

निरंक ....जाबदेणार

कै.अशोक गोरख लोहार ....मयत

अर्ज:- दि.बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२५ चाप्टर VIII चे कलम २ व ७ प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळण्याबाबत.

ज्या आर्थी अर्जदाराचे वडील कै.अशोक गोरख लोहार हे हिरे मेडिकल कॉलेज धुळे येथे मयत झाले असून, अर्जदाराला शासकीय व निमशासकीय कामासाठी अर्जदाराला त्यांचे वडील कै.अशोक गोरख लोहार यांच्या वारस दाखल्याची आवश्यकता आहे. म्हणून अर्जदाराने कै.अशोक गोरख लोहार यांचे १) श्रीमती आशाबाई अशोक लोहार (पत्नी), २) श्री.जगदीश अशोक लोहार (मुलगा), ३) श्री.जयेश अशोक लोहार (मुलगा), ४) माधुरी अशोक लोहार (मुलगी) हे वारस असल्याबाबतचा दाखला मिळण्यासाठी सदरचा अर्ज म.न्यायालयात दाखल केला आहे. या बाबत कुणाला काही हरकत असल्यास, त्या आर्थी सदर अर्जासंबधी कुणाला काही सांगयचे असेल, अथवा मांडायचे असेल, ते सांगण्यासाठी एका महिण्याच्या आत अथवा दि.२३/९/२०२६ रोजी दिवसा १०.३० वाजता स्वतःकिंवा ज्यास योग्यरित्या सूचना दिलेल्या आहेत. व जो सदर अर्जासंबधीच्या महत्वाच्या सर्व प्रश्नांची उत्तरे देवू शकेल, वकीला मार्फत या न्यायालयात उपस्थित होण्यासाठी याद्वारे जाहीर करण्यात येत आहे. त्या दिवशी त्यांनी बचावाचे लेखी निवेदन दाखल करावे त्याच दिवशी त्यांचा बचाव उलट तपास किंवा प्रतीसाद ज्या दस्तऐवजावर आधारलेला असेल असे दस्तऐवज सादर करावेत व अशा दस्तऐवजांची एक सूची करून ती त्यांच्या बचावाच्या लेखी निवेदनास जोडावी.

याद्वारे तमाम लोकांना जाहिर समन्स/नोटीस देण्यात येत आहे की, एका महिन्याच्या आत अथवा वर नमूद केलेल्या दिवशी कोणीही उपस्थित न राहिल्यास अथवा हरकत न आल्यास सदर अर्जाची सुनावानी केली जावून त्याचा निर्णय केला जाईल.

आज दि.२९/८/२०२६ रोजी माझ्या सहिने व न्यायालयाच्या सहिशिक्यानिशी दिले.

आदेशावरून

अधिक्षक
म.दिवाणी न्यायालय (व.स्तर), शहादा








* धुळे, दि.१- गेल्या पंधरा दिवसांपासून पावसाने दडी मारली असल्यामुळे जिल्ह्यातील शेतकरी चिंतेत सापडला आहे. कापसाला पाणी नसल्याने वाढ खुंटली आहे. मका पीक देखिल पावसा अभावी अडचणीत आला आहे. या सगळ्यांचा उत्पादनावर गंभीर परिणाम होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. अनेक ठिकाणी कपाशीमध्ये लाल्याचा प्रादुर्भाव दिसून येत आहे.


प्रकाश में आज उस्ताद




पवन कल्याण श्रीलीला राशि खन्ना, राव रमेश आर पार्थिबन रामकी आशुतोष राणा

## पान १ वरुन

### लोकसेवा आयोगाच्या पेपर फुटीत गौरव नंतर

चोर सोडून संन्यासाला पकडण्याचा प्रकार केला आहे. जो गौरव पाटील पेपरफुटी प्रकरणात माझ्यासोबत तक्रार द्यायला होता तो कसा काय आरोपी असू शकेल? तो आणि मी तुकाराम मुंढे यांना भेटून तक्रार दिली आणि त्यानंतर एमपीएससी आयोगात येऊन लेंडवे नावाच्या अधिकाऱ्याला भेटलो. तो पेपरफुटीचा मास्टरमाईंड आहे, असा आरोप तक्रारदार ऋषिकेश गांगुर्डे याने केला आहे. पायल किंवा तिच्या घरातल्या व्यक्तीने पेपर फोडलेला नाही. पेपर हा ज्या नकाते नावाच्या अधिकाऱ्याला अटक झाली आहे, त्याने आपल्या पुतण्यासाठी फोडला आहे. त्यानंतर ज्याने पेपर ५० लाख रुपयाना खरेदी केला त्याने पुढे आपले पैसे मिळविण्यासाठी दहा-दहा लाख रुपयाला विकला आणि तिथून पुढे मास लेव्हला ही पेपरफुटी झाली. याप्रकरणाची व्याप्ती सातारा बीड, सोलापूर जिल्ह्यात मोठी आहे. त्यातील सगळे एकमेकांचे नातेवाईक आहेत, असा गंभीर आरोपही ऋषिकेश गांगुर्डेनी केला आहे.

### सुप्रीम कोर्टाच्या निर्णयानंतर सीजेपीचा निषेध मोर्चा रद्द

आश्वासनानंतर न्यायालयाचा हा आदेश आला. केंद्र सरकारने आश्वासन दिले होते की, वीस जुलैच्या सीजेपीच्या आंदोलनाबाबत आंदोलकांवर दाखल केलेले खटले मागे घेतले जातील आणि त्याच आंदोलनाबाबत भविष्यात कोणतेही नवीन खटले दाखल केले जाणार नाहीत. तथापि, न्यायालयाने दिल्ली पोलिसांना जंतर-मंतर येथील आंदोलनात सहभागी असलेल्या दोन हजार ८७३ व्यक्तींविरुद्धच्या एका एफआयआरवर कारवाई सुरू ठेवण्याची परवानगी दिली, कारण त्यांची गुन्हेगारी पार्श्वभूमी गंभीर स्वरूपाची होती. सीजेपीचे प्रवक्ते सौरव दास यांनी सर्वोच्च न्यायालयाला सांगितले की, केंद्र सरकारचा सकारात्मक प्रतिसाद आणि सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय पाहता, संघटनेने पाच सप्टेंबरच्या आंदोलनाची हाक मागे घेण्याचा निर्णय घेतला आहे.

### राज्यातून आमली पदार्थांचे उच्छाटन

बंधनकारक करण्यात आले आहेत. याशिवाय सोलापूरच्या उन्नत मार्गाला सार्वजनिक प्रकल्पाचा दर्जा देण्यात आला. या प्रकल्पासाठी आवश्यक शासकीय जमीन भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाकडे हस्तांतरीत करण्याचा मार्ग यामुळे मोकळा झाला आहे. पुणे जिल्ह्यातील कुकडी पाटबंधारे प्रकल्पासाठी तब्बल पाच हजार ७०४ कोटींच्या तरतुदीस मंजुरी देण्यात आली. या प्रकल्पामुळे सुमारे एक लाख ४४ हजार ९१२ हेक्टर क्षेत्राला सिंचनासाठी पाणी उपलब्ध होण्याची अपेक्षा आहे.

**तुकाराम मुंढेंच्या कारवाईची चर्चा**

दरम्यान, अन्न व औषध प्रशासनाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांच्या नेतृत्वाखाली राज्यभर प्रतिबंधित गुटखा, पानमसाला आणि संबंधित पदार्थांविरोधात कारवाई सुरू आहे. त्यांच्या नेतृत्वाखाली अन्न, औषध प्रशासनाकडून विविध ठिकाणी तपासणी आणि कारवाई केली जात आहे. कठोर प्रशासनशैली, नियमांची अंमलबजावणी आणि शिस्तप्रिय अधिकारी, अशी तुकाराम मुंढे यांची ओळख आहे. यापूर्वी त्यांनी नाशिक महापालिका, पुणे महानगर परिवहन महामंडळ, नागपूर महापालिका आणि सोलापूर महापालिका यांसह विविध महत्त्वाच्या पदांवर काम केले आहे. मंत्रीमंडळ बैठकीतील आरोग्यदायी अन्नपदार्थांच्या धोरणामुळे त्यांच्या नेतृत्वाखाली सुरू असलेल्या अन्नसुरक्षा आणि प्रतिबंधित खाद्यपदार्थांविरोधातील मोहिमेला आणखी व्यापक प्रशासकीय पाठबळ मिळण्याची शक्यता आहे.

### ग्रामपंचायत अधिकाऱ्यांनी सुरक्षिततेसह

कार्यालयापर्यंत ग्रामपंचायत अधिकाऱ्यांनी विविध मागण्यांची फलके हातात घेवून मुकमोर्चा काढण्यात आला. युनियनच्यावतीने करण्यात आलेल्या विविध मागण्यांमध्ये शिवरे ता.पारोळा येथील घटनेतील दोषींवर खुनाचा गुन्हा दाखल करून तात्काळ अटक करावी. तसेच खटला जलद गती न्यायालयात चालवण्यात यावा. महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियमात सुधारणा करून दहा ते बारा ग्रामसभांऐवजी वर्षातून केवळ एकच आर्थिक नियोजन, आढावा ग्रामसभा ठेवण्याची तरतूद करण्यात यावी. अनधिकृत चित्रीकरण व सोशल मीडिया बदनामीवर बंदी, संवेदनशील व वादग्रस्त ग्रामपंचायतीच्या बैठकांकरीता प्रशासनाकडून सक्तीने व विनामुल्य पोलीस बंदोबस्त पुरवण्यात यावा. वैयक्तीक लाभाच्या योजनांचे लाभार्थी ग्रामसभेत निवडण्याऐवजी पंचायत समितीस्तरावर संबंधित विभागांमार्फत छाननी करून पारदर्शकपणे अंतिम करण्यात यावेत. धुळे तालुक्यातील ग्रा.पं.उडाणे, शिरपूर तालुक्यातील ग्रा.पं.झेंडअंजन व ग्रा.पं.नवे लोंढरे येथील दोषींवर कारवाई करण्यात यावी. अशा विविध मागण्यांचा समावेश आहे.

### स्मार्ट मीटरमध्ये छेडछाड ग्राहकांवर गुन्हे दाखल

(सर्व रा.गौसियानगर, दोंडाईचा ता.शिंदखेडा) या ग्राहकांनीही मीटरमध्ये छेडछाड केल्याचे आढळले. सहायक अभियंता सचिन पावरा यांच्या फिर्यादीवरून चारही आरोपींवर गुन्हा दाखल करण्यात आला. या सर्व प्रकरणात वीजमीटरला छेडछाड करून चोरीस साह्य करणाऱ्या अज्ञात इसमाविरुद्धही गुन्हा दाखल करण्यात आला आहे. स्मार्ट मीटरमध्ये छेडछाडीची पद्धत समान स्वरूपाची असल्याने, या प्रकारामागे एखादी व्यक्ती, टीम अथवा वीजचोरीसाठी कार्यरत रॅकेट आहे का, याचाही तपास करण्यात येत आहे. ग्राहकांना मीटरमध्ये छेडछाड करण्यासाठी मदत करणाऱ्या, छेडछाड करणाऱ्या किंवा अशा गैरप्रकारात सहभागी असलेल्या व्यक्तींविरुद्धही कायद्यानुसार कठोर कारवाई करण्यात येणार आहे. सर्व प्रकरणांमध्ये भारतीय विद्युत कायद्याच्या कलम १३५, १३८ व १५० अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### शहरातील विविधांगी प्रश्नांवर लक्ष वेधण्यासाठी

साजरा करण्यासाठी जनजागृती करावी, अशी भूमिका मांडण्यात आली. यासाठी पोलीस प्रशासना, निवेदन देण्याचे ठरविण्यात आले. जाहिरात फलक मुक्त गणेशोत्सव साजरा व्हावा, अशी भुमिका काहींनी मांडली. गणेशोत्सव, वाढदिवस आणि विविध कार्यक्रमांच्या निमित्ताने शहरातील रस्त्यांवर मोठ्या प्रमाणावर जाहिरात फलक लावले जातात. त्यामुळे वाहतुकीला अडथळा निर्माण होतो. यासंदर्भात पोलीस आणि जिल्हा प्रशासनाकडे निवेदन द्यावे, असे ठरले. यापुढे दरमहा नियमित बैठक घेऊन प्रशासनास त्यांच्या कर्तव्याची जाणीव करून देण्याचा निर्णय घेण्यात आला. शहरातील रस्ते, गटारी, वाहतूक व्यवस्था, ध्वनिप्रदूषण, अनधिकृत जाहिरात फलक तसेच नागरिकांच्या दैनंदिन जीवनाशी निगडित विविध प्रश्नांवर सातत्याने पाठपुरावा करण्याचा निर्धार बैठकीत करण्यात आला.

### महापालिकेची फायर ऑडीटबाबत कार्यवाही

तसेच आवश्यक त्रुटींची पूर्तता करणे बंधनकारक करण्यात आले आहे. सदरची कार्यवाही ३० सप्टेंबर २०२६ पर्यंत पूर्ण करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. निर्धारित मुदतीत आवश्यक कार्यवाही न करणाऱ्या वैद्यकीय आस्थापनांविरुद्ध नियमानुसार कठोर कारवाई करण्यात येणार असून, आवश्यकतेनुसार संबंधित आस्थापना सीलबंद करण्याची कार्यवाही केली जाणार आहे.

तसेच फायर ऑडीट न करणे अथवा अग्निसुरक्षा नियमांचे पालन न करणे याबाबत शासन नियमांनुसार निर्धारित शुल्कावर शास्तीची तरतूद असल्याचे महानगरपालिकेने स्पष्ट केले आहे. रुग्णांची सुरक्षितता ही सर्वांची सामूहिक जबाबदारी असून, केवळ नियमांचे पालन म्हणून नव्हे तर रुग्ण, डॉक्टर, परिचारिका, कर्मचारी व नागरिकांच्या जीविताच्या सुरक्षेसाठी सर्व वैद्यकीय आस्थापनांनी फायर ऑडीटची कार्यवाही तात्काळ पूर्ण करावी, असे आवाहन धुळे महानगरपालिकेतर्फे करण्यात आले आहे.

### पातळ दुधास भेसळीने घट्ट करुन ते

संहितेतील कलम २७४, २७५, १२३ व ३१८ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या गुन्ह्याचा पुढील तपास पीएसआय नामदेव बोरकर हे करीत आहेत. आरोपीला न्यायालयीन कोठडी सुनावण्यात आली आहे.

# महिला महाविद्यालयात कला मंडळाची स्थापना
# विद्यार्थीनिंनी बोलीभाषेतही लेखन करावे- पावरा

**शिरपूर, दि.१- साहित्य ही एक समाजोपयोगी कला आहे, असे नमूद करून साहित्यनिर्मितीच्या विविधपैलूंवर प्रकाश टाकला. विद्यार्थिनींनी प्रमाण भाषेबरोबरच आपल्या मातृभाषेतील बोलीभाषेतही मोकळेपणाने लेखन करावे, असे आवाहन त्यांनी केले. बोलीभाषा ही त्या प्रदेशाच्या सांस्कृतिक अस्मितेचे जतन करणारे प्रभावी माध्यम असून, बोलीभाषेतील साहित्यामुळे स्थानिक संस्कृती, परंपरा, रूढी, जीवनशैली, लोकपरंपरा आणि लोकजीवनाचे वास्तववादी व प्रभावी प्रतिबिंब साहित्यात उमटते, असे भिमराज पावरा यांनी स्पष्ट केले.**

विद्यार्थिनींच्या अंगी असलेल्या सुप्त कलागुणांसह सर्जनशीलतेला व्यासपीठ उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने येथील एच. आर. पटेल कला व विज्ञान महिला महाविद्यालयात कला मंडळाची स्थापना करण्यात आली.प्राचार्य डॉ. गजानन पाटील यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या कार्यक्रमास चोपडा येथील साहित्यिक भिमराज पावरा प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. प्रारंभी सरस्वतीच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून कार्यक्रमाचे उदघाटन करण्यात आले.

प्रास्ताविकात डॉ. युवराज पवार यांनी कला मंडळाची भूमिका व उद्दिष्टे स्पष्ट केली. भिमराज पावरा यांनी यावेळी त्यांनी पावरी बोलीभाषेतील दोन आशयघन कविता सादर केल्या. तसेच पावरा समाजातील वातरा, कहाणी आणि कोडे यांचेही आपल्या ओघवत्या व प्रभावी शैलीत सादरीकरण केले. त्यांच्या या सादरीकरणातून पावरी बोलीभाषेची समृद्धता, गोडवा आणि लोकजीवनाशी असलेले तिचे अतूट नाते प्रभावीपणे स्पष्ट झाले.

अध्यक्षीय मनोगतात प्राचार्य डॉ. गजानन पाटील यांनी विद्यार्थिनींच्या सर्वांगीण व्यक्तिमत्त्व विकासासाठी कला, साहित्य आणि सांस्कृतिक उपक्रमांची भूमिका महत्त्वपूर्ण असल्याचे सांगितले. यावेळी डॉ. मनीषा चौधरी, प्रा. अंकेश पावरा, प्राध्यापकवृंद व विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. सूत्रसंचालन डॉ. इंदिरा गिरासे यांनी केले. प्रा. गुलाबसिंग वळवी यांनी भिल्ल बोलीत आभार मानले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी अजय गोयल व नानाभाऊ सोनवणे यांनी प्रयत्न केले.

## निधन वार्ता

### बायजाबाई तेले



लामकानी, दि.१- धुळे तालुक्यातील लामकानी येथील बायजाबाई लक्ष्मण तेले यांचे दि.१ सप्टेंबर २०२६ रोजी सायंकाळी ८ वा. वृद्धापकाळाने निधन झाले. मृत्यूसमयी त्या ७५ वर्षांच्या होत्या. त्यांची अंत्ययात्रा आज दि.२ सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी ११ वाजता राहत्या घरापासून काढण्यात येणार आहे. त्या लक्ष्मण सदा तेले यांच्या धर्मपत्नी तर संतोष लक्ष्मण तेले यांच्या मातोश्री होत.





सोफा, डायनींग टेबल, सोफा- कमबेड, पलंग, दिवान, टिपाई, कपाट, ड्रेसींग टेबल, आराम चेअर, ऑफीस टेबल ऑफीस चेअर तसेच वास्तु-शास्त्रा योग्य शेवन लाकडाचे मंदिर तसेच मार्बलचे मंदिर आणि तुळशी वृंदावन..



**शिवम कॉर्पोरेशन**
प्रकाश टॉकीज समोर, पारोळा रोड, धुळे
फो. 9595397718, 9665886722

**फ्लॅट विकणे आहे**
वेल फर्निचरसह फ्लॅट 2 BHK 850 स्क्वे. फुट विकणे आहे..
-:संपर्क :-
कुबेर अपार्टमेंट
फ्लॅट नं. ८ प्लॉट ११
देवपूर धुळे
9422787659

**WANTED ACCOUNTANT — REQUIRED —**
SIDDHANT AGRAWAL & ASSOCIATES
CA OFFICE – MIDC, DHULE
QUALIFICATION: B.Com / M.Com
EXPERIENCE: 2–5 years preferred
JOB LOCATION: Awadhan, MIDC, Dhule
SALARY: Negotiable – As per qualification & experience
SKILLS REQUIRED
- Tally Prime & MS Excel
- Purchase & Sales Accounting
- Bank Reconciliation & Finalization
- Day-to-day accounting and documentation
JOIN OUR TEAM — JOIN IMMEDIATELY PREFERRED
INTERESTED CANDIDATES MAY CONTACT: 7507239218 | Send your CV to: siddhantdilipagrawal@gmail.com
GROW YOUR CAREER WITH US!

**पाहिजेत**
आनंद खेडा बस स्टॅण्ड समोरील एन.ए.प्लॉटस रस्ता–लाईट–पाणी–गटार सुविधायुक्त प्लॉटस विकणे आहेत.
-: संपर्क :-
9921199726
9922667001

**पाहिजेत**
हॉटेल करीता शिकाऊ मुले वेटर पाहिजेत. रहाणे खाणे सुविधा.
-: संपर्क :-
हॉटेल निलानंद आनंदखेडे
9922667001
9921199726

**पाहिजेत**
दुकान कामासाठी माणूस/मुलगा पाहिजे पार्ट टाईम/फुल टाईम
-: समक्ष भेटा :-
अन्नपूर्णा जलगाववाला
मावा कुल्फी. आग्रा रोड, गांधी चौक, धुळे

**पाहिजेत**
होलसेल मेडिकल दुकानासाठी
१) कॉम्प्युटर ऑपरेटर (महिला)– जागा २
२) हेल्पर – जागा १
३) सेल्समन– जागा २
-: समक्ष भेटा :-
श्री साई फार्मा
ग.नं.५, धुळे.

**पाहिजेत**
१) इंजिनिअर
२) सुपरवायझर
३) कार ड्रायव्हर/हायवा ड्रायव्हर
४) JCB ऑपरेटर/पोकलॅन ऑपरेटर
अनुभवी व निव्यर्सनी उमेदवारांनी
-: संपर्क :-
संजय पाटील
9765552556

**पाहिजेत**
१) मुली/महिला सेल्स Executive
२) मुली/महिला Exhibition Executive
३) मुली/महिला Retail Executive
फक्त मुली/महिलांना प्राधान्य दिले जाईल.
आपला Resume व आधार कार्ड सह भेट
वेळ- Manisha's food Product's shree hakur watch Company Agra road, Phoolwala chowk, Dhule

**सेल्समन पाहिजेत**
चहा पावडर वाटप साठी सेल्समन पगार–
पार्ट टाईम– १०,०००/–
फुल टाईम– २०,०००/–
वेळ– पार्ट टाईम– स. ६ ते १२ किंवा दु.२ ते ८ रात्री
फुल टाईम– स. ६ ते १२/दु. २ ते ८ रात्री.
रोशन-टी-चोरडीया, धुळे
प्लॉट नं.११, भगा मोहन नगर, नटराज टॉकी मागे, धुळे,
8208053452

**घर विकणे आहे**
न. भु. क्र. ४७८८/ब-१०/धुळे १
प्लॉट नं. ४७८८/ब-१०
क्षेत्र चौ. मी. १६७.२०
भिडे बाग, धुळे ता.जि. धुळे
......
R.C.C. दोन मजली बांधकाम १८०० स्क्वे. फिट पश्चिम मुखी दोन रोड कॉर्नर.
-:संपर्क :-
वैभव वि. उपासणी
7387700466

**प्लॉट विकणे**
3900 sq.ft. 15 mtr DP road front २ रोड कॉर्नर प्लॉट विकणे. अरुण कुमार वैद्य नगर
-: संपर्क :-
7391055331

**पाहिजेत**
१) रिसेप्शनिस्ट कॉलेजच्या मुलींना प्राधान्य– १
२) सिस्टर – स्त्री २
डॉ.संदिप शिलाहार
9822311109

**पाहिजेत**
क्लिनिकच्या कामासाठी मुलगी/लेडीज पाहिजे
साई स्किन केअर & डेंटल सेंटर, जयहिंद ज्युनिअर–सिनिअर कॉलेज लिंक रोड, एसबीआय बँकेच्या बाजुला, देवपूर, धुळे.
9823628873

**दुकान विकणे आहे**
आग्रा रोड सत्कार लॉज खाली 13x13 चे खाली दुकान विकणे आहे.
-:संपर्क :-
9422296273

**घर भाड्याने देणे आहे**
2 BHK फ्लॅट सर्व सोई युक्त भाड्याने देणे आहे.
-:संपर्क :-
9422296273

**पाहिजेत**
१ ग्राफिक्स डिझायनर मुलगा पाहिजे कोरल ड्रॉ आणि मराठी टायपिंग येणे आवश्यक
-:समक्ष भेटा :-
नहुष डिजिटल प्रिंटर्स, धुळे
8788942027
9028921347

**प्लॉट विकणे आहे**
धुळे जमनागिरी दत्तमंदिर लगतचे २ प्लॉट ओपन स्पेस लागून सुमारे ११००० स्क्वे. फुट प्लॉट विकणे आहे.
-: संपर्क :-
9403532858

**शेती विकणे आहे**
दोंडाईचा तावखेडा ता.शिंदखेडा येथील तापी काठची क्लिअर टायटल शेत जमीन विकणे आहे. गट नं.५३ क्षेत्र २ हेक्टर्स ४७ आर व गट नं.६९/१ क्षेत्र ६२ आर.
-: संपर्क धुळे :-
9403532858

**पाहिजेत**
आयटीआय झालेला मुलगा शिकाऊ टर्नर, वेल्डर पाहिजे
संपर्क:– शाह इंजिनिअरिंग वर्ल्स अ‍ॅण्ड मशिनरी पार्टस् सुबानी मस्जिद बाजुला लोहा बाजार ८० फुटी रोड, धुळे
मो. 9403474944
9423474740

**पाहिजेत**
मेडिकल होलसेल दुकानात कामासाठी मुले/मुली पाहिजेत
१) कॉम्प्युटर ऑपरेटर/अकाऊन्टेंट
२) सेल्समन बाहेर गांवसाठी
३) मदतनीस/हेल्पर
संपर्क :- संजय मेडिकल्स् गल्ली नं.२, धुळे

**विकणे आहे**
१५'.५''X६३'
पुर्व–पश्चिम असलेली मोकळी जागा त्वरीत विकणे आहे.
-: ब्रोकर संपर्क :-
7744010511
8888269758

**विकणे आहे**
ऊस गल्ली मध्ये 13'X 55" जागा विकणे आहे.
-: संपर्क :-
7020469216

**पाहिजेत**
कारागिर, वेटर व हेल्पर लावणे आहे.
-: संपर्क :-
9022803196
8805589555

**पाहिजेत**
पेट्रोल पंपावर कामासाठी मुले पाहिजे
-: समक्ष भेटा :-
सुपर सर्वोसेंटर इंडियन ऑईल पंप
पांझरा पोळ समोर, पारोळा रोड, धुळे

**पाहिजेत**
कामासाठी पाहिजे
सेल्समन – २
सेल्सगर्ल – २
श्याम वॉच अ‍ॅण्ड गिफ्ट सेंटर
फुलवाला चौक, धुळे
7219036785
9960777594

**गरम पाण्याचा एकच उपाय...**
BAJAJ — Crompton — Racold — USHA




आजच खरेदी करा आणि मिळवा पाईप सोबत फिटिंग फ्री *...

59 वर्षापासून आपल्या सेवेत...
अधिकृत विक्रेते **श्री महावीर** इलेक्ट्रीक अ‍ॅण्ड टी.व्ही.
श्रीराम मंदिराजवळ, फुलवाला चौक, आग्रा रोड, धुळे ▪ फोन: 229162, 235763


हे पत्र संपादक, मालक, प्रकाशक, हेमंत सुधाकर मदाने यांनी हेमंत प्रिंटींग प्रेस, वीर सावरकर मार्ग, धुळे येथे मुद्रित करून आपला महाराष्ट्र, जनशक्ती, वीर सावरकर मार्ग, धुळे–४२४००१ येथे प्रकाशित केले. दुरध्वनी मुख्य कार्यालय, धुळे (०२५६२) २३५३९६, २३८३९६, aplamaha@gmail.com नंदुरबार २२३४४४ aplamahashd@gmail.com शहादा–२५६९३९, मालेगाव–२४३१३३६, नाशिक–२५७५९८९, पुणे–९८२३०४६५२२, आपला महाराष्ट्र–रजि.नं.एम.एच.डी.आय.ए.१७ र.नं.११२२२/६०